Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 16/10/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाचण्या, आतल्या वाचण्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

## दिनविशेष



### लेखक, समाजसुधारक अनंत हरि गद्रे

अनंत हरि गद्रे हे वार्ताहर, लेखक, नाटककार व थोर समाजसुधारक होते. त्यांना नाटिका संप्रदायाचे प्रवर्तक मानले जाते. त्यांचा जन्म १६ ऑक्टोबर १८९० रोजी कोकणातल्या देवरूख येथे झाला. ते शिक्षणासाठी पुण्यात आले. येथे त्यांचे शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन महाविद्यालय अशा नामवंत ठिकाणी झाले. रंगभूमीच्या पडत्या काळात रंगभूमीला सावरण्याचा ज्यांनी प्रयत्न केला. त्यापैकी अनंत हरी गद्रे हे एक होते. रात्रभर चालणाऱ्या नाटकांपेक्षा गद्रे यांनी एक, दीड ते तीन तासात संपणाऱ्या नाटिका लिहायला सुरुवात केली. त्यांच्या 'प्रेमदेवता' या पहिल्या नाटिकेचा १ ऑगस्ट १९३० रोजी बालमोहन संगीत मंडळीने केलेला पहिला प्रयोग हा, या नाटिकेच्या वेगळेपणामुळे आणि त्याला लागणाऱ्या कमी वेळामुळे प्रेक्षकांना पसंत पडला. नंतर गद्रे यांनी 'संदेश'मधून पत्रकारितेचे धडे गिरवले.

१९२२ मध्ये सुरू झालेल्या 'मौज' या साप्ताहिकातील त्यांची संपादकीयेही लोकप्रिय झाली. १९३४ मध्ये सुरू केलेल्या 'निर्भीड' या आपल्या दुसऱ्या साप्ताहिकातून गद्रे यांनी सामाजिक समतेचा पुरस्कार करीत स्पृश्यास्पृश्यता आणि केशवपनासारख्या वाईट चालींवर कडाडून टीका केली. दलित आणि सवर्णांमधील सामाजिक दरी मिटवण्यासाठी 'झुणका-भाकर चळवळी'सारखे प्रयोग गद्रे यांनी केले. 'झुणका-भाकर' चळवळीमध्ये समाजाच्या सर्व थरांतील, सर्व जातींचे लोक एकत्र येऊन भोजन करीत असत. झुणका-भाकर सहभोजन आणि स्पृश्यास्पृश्य सत्यनारायण ही दोन तंत्रे त्यांनी त्यासाठी वापरली. सामाजिक क्षेत्रात सहासन, सहभोजन, सहपूजन, सहवसन आणि सहबंधन (आंतरजातीय विवाह) या पंचशीलांचा पुरस्कार गद्रे यांनी केला. अशा या द्रष्ट्या समाजसुधारकाचे ३ सप्टेंबर १९६७ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Oct 16, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401